# 'मेट्रो-३'चे चार डबे मुंबईत दाखल

मुंबई - मेट्रो-३ (कुलाबा-वांद्रे-सीप्झ) मार्गिकेसाठीच्या पहिल्या मेट्रो गाडीचे चार डबे अखेर मुंबईत दाखल झाले आहेत. आंध्र प्रदेशातील श्रीसिटी येथून दोन आठवड्यांपूर्वी ट्रेलर्समधून हे डबे मुंबईसाठी रवाना झाले होते. मंगळवारी पहाटे डबे मुंबईतील मरोळ-मरोशी येथील तात्पुरत्या कारशेडमध्ये दाखल झाले आहेत. श्रीसिटीत मेट्रो ३ साठीच्या गाड्यांची बांधणी करण्यात येत आहे. आठ डब्यांची एक मेट्रो गाडी असणार आहे. त्यानुसार पहिली गाडी तयार झाली होती. मात्र तात्पुरत्या कारशेडच्या कामाअभावी ही गाडी मुंबईत आणता येत नव्हती; पण आता मात्र गाडीचे चार डबे आले असून, उर्वरित चार डबे लवकरच मुंबईत येतील, अशी माहिती मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) दिली. त्यानंतर मेट्रो-३ची तीन किमी लांबीची चाचणी घेतली जाईल, असेही स्पष्ट केले आहे.